आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

११ जून २०२४ - मंगळवार

केंद्रातल्या नव्या मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झाल्यानंतर आज नवनियुक्त मंत्र्यांनी आपापल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. एस. जयशंकर यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रीपदाचा कार्यभार हातात घेतला.राजनाथ सिंह यांनी संरक्षण मंत्री पदाचा, अमित शहा यांनी गृहमंत्रीपदाचा, तर जे. पी. नड्डा यांनी आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारला. प्रतापराव जाधव यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून सूत्रं हातात घेतली. शिवराज सिंह चौहान यांनी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा, तर गजेंद्र सिंह शेखावत यांनी सांस्कृतिक मंत्रालयाचा पदभार स्वीकारला. ज्योतिरादित्य शिंदे यांनी दूरसंवाद मंत्री म्हणून पदभार स्वीकारला. रक्षा खडसे यांनीही क्रीडा राज्यमंत्री म्हणून कार्यभार स्विकारला. अश्विनी वैष्णव यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रीपदाची, तर डॉ. एल. मुरुगन यांनी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्रीपदाची सूत्रं हातात घेतली. हरदीप सिंह पुरी यांनी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री म्हणून, तर सुरेश गोपी यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून, पदाचा कार्यभार स्विकारला तसंच किरेन रिजिजू यांनी संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक मंत्री म्हणून, तर मनोहर लाल यांनी केंद्रीय ऊर्जामंत्री म्हणून कार्यभार स्विकारला.

**<><><><><>**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत यंदा पेपरफुटी आणि काही गैरप्रकार झाल्याचा आरोप करत त्याच्या चौकशीची आणि पूर्ण परीक्षा प्रक्रीयाच रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती अहसानउद्दीन अमान उल्लाह यांच्या सुट्टीकालीन पीठानं त्यावर राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस बजावली असून पुढची सुनावणी येत्या ८ जुलैला ठेवली आहे. मात्र परीक्षेनंतरच्या

काउन्सिलिंग प्रक्रीयेला स्थगिती द्यायला न्यायालयानं नकार दिला. अशाच आशयाच्या याचिका कोलकाता आणि दिल्ली उच्च न्यायालयातही दाखल झाल्या आहेत.

<><><><><>

राज्य विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी छाननीनंतर एकंदर ८८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरता येत्या २६ जून रोजी मतदान होणार आहे. उद्यापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. १ जुलैला मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

मुंबई पोलीसांची २०२१ या वर्षीची  प्रलंबित भरती प्रक्रिया तातडीनं  पूर्ण करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

संथगतीनं होणाऱ्या भरती प्रक्रियेमुळे उमेदवारांना होणाऱ्या त्रासाची आणि  या प्रलंबित प्रकरणाची दखल गृहमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी घ्यावी अशी  मागणी  सुळे यांनी  समाजमाध्यमावर लिहीलेल्या संदेशात केली आहे.

<><><><><>

दहावा आंतरराष्ट्रीय योगदिन येत्या २१ जून रोजी साजरा होणार आहे. या निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी योगाचं महत्त्व अधोरेखित केलं आहे. सर्वांनी योगाला आपल्या जगण्याचा अविभाज्य भाग करून घ्यावं आणि इतरांनाही तसं करण्यासाठी प्रोत्साहन द्यावं, असं आवाहन त्यांनी केलं आहे. विविध योगासनं

आणि त्यांचे फायदे सांगणारी एक ध्वनिचित्रफीतही प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमांवर शेअर केली आहे.

<><><><><>

भारताचे टेनिसपटू रोहन बोपण्णा आणि सुमित नागल या दोघांनी आपल्या एटीपी क्रमवारीच्या जोरावर आगामी पॅरिस ऑलिम्पिकमधलं आपलं स्थान निश्चित केलं. रोहन बोपण्णा दुहेरीत, तर सुमित नागल एकेरीत भारताचं प्रतिनिधित्व करेल.

<><><><><>

डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या पुरुष कनिष्ठ गट विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भारताला देण्यात आलं आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानं आज स्वित्झर्लंड मध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला. यंदा या स्पर्धेत २४ संघ भाग घेणार आहेत.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल न्यूयॉर्क इथं झालेल्या चुरशीच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं बांगलादेशचा चार धावांनी पराभव केला. आज पाकिस्तान आणि कॅनडा या संघांदरम्यान सामना होणार आहे.

<><><><><>

राज्याच्या बहुतांश भागांमध्ये पावसानं हजेरी लावली आहे. मुंबईत काल संध्याकाळी उशिरा मुसळधार पाऊस झाला. पुण्यात झालेल्या पावसानं ठिकठिकाणी पाणी साचलं आहे. बीड जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. जिल्ह्यातल्या ४ महसुली मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. जळगाव जिल्ह्यात काल मध्यरात्रीपासून मुसळधार पावसानं हजेरी लावली. लातूर जिल्ह्यात काल दिवसभराच्या विश्रांतीनंतर संध्याकाळी पावसानं जिल्ह्याच्या अनेक

भागांना झोडपून काढलं. काही ठिकाणी अतिवृष्टीही झाली आहे. अहमदनगर जिल्ह्यात आज सकाळपासून पाऊस सुरू आहे. जालना जिल्ह्याच्या बहुतांश भागांत काल रात्री जोरदार पाऊस झाला. आजही संततधार सुरू आहे. अकोला शहरात काल मध्यरात्रीच्या सुमाराला विजांच्या गडगडाटासह पावसानं हजेरी लावली. परभणी जिल्ह्याच्या मानवत तालुक्यातल्या मानोली शिवारात काल दुपारी चारच्या सुमाराला ढगफुटीसदृश पाऊस झाल्यानं ओढ्याला आलेल्या पुरात दोन महिला वाहून गेल्या.

//<><><><><>//